# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

## व्यवस्थापन परिषदेच्या १८९ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत
## सोमवार, दि. ०९ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी ११:३० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १८९ वी (तातडीची) बैठक **सोमवार, दि.०९ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी ११:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश आण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | अनुपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | ऑनलाईन उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १८) | डॉ. नलिनी टेंभेकर<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | अनुपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
| --- | --- | --- | --- |
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस डॉ. अजित मधव पाटणकर यांनी आपली अनुपस्थिती कळविली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | दि. २९ नोव्हेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि. २९ नोव्हेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८८ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | विषय क्र.१५(१०) मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | मंद्रुपकर श्रुतीका महेश या विद्यार्थिनीची मार्च २०२३ B.A.II मधील पर्यावरणशास्त्र या विषयाच्या गुणांची संगणक प्रणालीत नोंद घेण्याबाबत परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या दि.२७/११/२०२४ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.३.१ नुसार केलेली शिफारस सर्वानुमते स्विकारण्यात आली. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | मंद्रुपकर श्रुतीका महेश या विद्यार्थिनीची मार्च २०२३ B.A.II मधील पर्यावरणशास्त्र या विषयाच्या गुणांची संगणक प्रणालीत नोंद घेण्याबाबत परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या दि.२७/११/२०२४ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.३.१ नुसार रु.२,०००/- दंडाची केलेली शिफारस सर्वानुमते स्विकारण्यात आली व यापुढे निकालाच्या २ महिन्यानंतर दुरुस्तीसाठी आलेल्या अशा स्वरुपाच्या प्रकरणामध्ये प्रती विद्यार्थी रु.२,०००/- इतका दंड संबंधित महाविद्यालयाकडून आकारण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०२ ] | **प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करणेबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून पदवी भाग २ व ३ या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयाने मागणी केल्याप्रमाणे वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करण्याबाबत दि.२८/०८/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठरावाची दि.०३/०९/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत झालेल्या दुरुस्ती ठरावाच्या अनुरोधाने डॉ. तानाजी कोळेकर, विद्यापरिषद सदस्य, या गठित समितीचा अहवाल दि.२५/११/२०२४ रोजीच्या बैठकीत सादर केला असता ४०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी घेतलेल्या महाविद्यालयांकडून प्रती विद्यार्थी रु.१,०००/- याप्रमाणे दंड आकारणेबाबत निर्णय घेण्यासाठी विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाकडून मागील शैक्षणिक वर्षी (२०२२-२३ व २०२३-२४) अनुक्रमे भाग १ व २ करिता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा जादा वाढीव विद्यार्थी संख्येस प्रवेश देण्याबाबत मान्यता देण्यात आलेली असून त्याच्या परिणाम स्वरुपी व उदा. माऊली महाविद्यालय, वडाळा येथील महाविद्यालयात बी. ए. प्रथम वर्षाकरीता मूळ प्रवेश क्षमता १२० व अतिरिक्त तुकडी ०१ ची प्रवेश क्षमता १२० अशी एकुण प्रवेश क्षमता २४० आहे. तर बी.ए. भाग-२ करिता मूळ प्रवेश क्षमता १२० आहे आणि बी. ए. भाग-३ करिता देखील १२० आहे. यास्तव विद्यापीठाकडून मंजूर करण्यात आलेली वाढीव विद्यार्थी प्रवेश संख्या व बी. ए. भाग-१ च्या परिणाम स्वरुपीची नैसर्गिक वाढ या बाबीच्या अनुरोधाने संलग्नित महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी भाग-२ व भाग-३ करिता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थी संख्येस प्रवेश देण्यास मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव प्राप्त झाले होते.<br>त्या अनुषंगाने दि.२२/०७/२०२४ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आली होती. सदर टिपणीवर मा. प्र-कुलगुरु महोदयांनी पुढीलप्रमाणे पृष्ठांकन केलेले आहे. "स्वतंत्र समिती महाविद्यालयास पाठवून तेथील सेवा सुविधा व नियमाप्रमाणे सर्व गोष्टी तपासून घेणेकरिता व समिती पाठविणे करिता मान्यतेस्तव सादर. सदर कमिटीचे T.A. नियमाप्रमाणे महाविद्यालयांकडून सदस्यांना देण्यास मान्यतेस्तव सादर." तर मा.कुलगुरु महोदयांनी पुढील प्रमाणे पृष्ठांकन केलेले आहे. "१) Not approved as per AC resolution but LIC can be sent. २) १०% increase is approved." व दि.०५/०८/२०२४ रोजीच्या कार्यालयीन टिपणीवर मा. प्र-कुलगुरु महोदयांनी पुढीलप्रमाणे पृष्ठांकन केलेले आहे. "कमिटी पाठवूनच मान्यतेकरिता सादर करण्यास्तव मंजूरीस सादर. जिथे फक्त १०% वाढ मागितलेली आहे तेथे १०% वाढ देण्यास मंजूरीकरिता सादर." तर मा. कुलगुरु महोदयांनी त्यास मान्यता दिलेली आहे. मा. प्र-कुलगुरु व मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार संबंधित महाविद्यालयास मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा जादा वाढीव विद्यार्थी संख्या मान्यतेबाबतचे पत्र पाठविण्यात आलेले आहे. तर आदेशानुसार उर्वरित प्रशासकिय कामकाजाकरिता संबंधित महाविद्यालयास स्थानिक चौकशी समिती पाठविणे कामी नामनिर्देशनास्तव दि.२०/०८/२०२४ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आली होती. सदर कार्यालयीन टिपणीवर मा.प्र-कुलगुरु महोदयांनी "ब" प्रमाणे मान्यतेस्तव सादर तर मा. कुलगुरु महोदयांनी प्र-कुलगुरु महोदय यांच्याशी झालेल्या चर्चेअंती Please place before upcoming Academic Council असे पृष्ठांकन करुन आदेशित केले. सदरचे प्रकरण दि.२८/०८/२०२४ रोजीच्या विद्यापीठ अधिकार मंडळाच्या (विद्यापरिषदेच्या) बैठकीसमोर सादर केले असता, त्यावर ठराव क्र.०५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे. | संलग्नता विभाग |

"शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करणेबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून पदवी भाग २ व ३ याअभ्यासक्रमासाठी महाविद्यालयाने मागणी केल्याप्रमाणे वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करण्याबाबत खालील प्रमाणे अटींच्या राहून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

१. ज्यामहाविद्यालयांना १०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्येची मागणीकेली आहे, अशा महाविद्यालयांना यापूर्वी डॉ. तानाजी कोळेकर, विद्यापरिषद सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या ५ सदस्यीय समितीने भेटी द्याव्यात. सदर समितीचा प्रवास व दैनिक भत्ता याचा खर्च संबंधीत महाविद्यालयांनी अदा करावा.
२. १०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्येची मागणी केलेल्या महाविद्यालयांनी सर्व सोयी सुविधांची पूर्तता केली आहे का नाही, याबाबत सदर समितीने खात्री करावी.
३. येथून पुढे १०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्या कोणत्याही महाविद्यालयास देण्यास येऊ नये.
४. १०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्या मागितलेल्या महाविद्यालयाकडून प्रती विद्यार्थी रु.१,०००/- याप्रमाणे दंड आकारण्यात यावा.
५. महाविद्यालयाकडून अटींची पूर्तता होत नाही तो पर्यंत सदर समिती महाविद्यालयांस भेट देईल.
६. वाढीव विद्यार्थी संख्येसंदर्भात या महाविद्यालयाव्यतिरिक्त इतर महाविद्यालयांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यांना या ठरावानुसार कार्यवाही करुन मान्यता देण्यात यावी.

दरम्यानच्या कालावधीत प्रशासकीय कार्यवाही सुरु असताना संदर्भ क्र.०२ अन्वये दि.०३/०९/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत ठराव क्र.०१ अन्वये दुरुस्त केलेला ठराव खालील प्रमाणे आहे.

"शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करणेबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून पदवी भाग २ व ३ या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयाने मागणी केल्याप्रमाणे वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करण्याबाबत खालीलप्रमाणे अटींच्या राहून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

१ ज्या महाविद्यालयांना ४०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्येची मागणी केली आहे, अशा महाविद्यालयांना यापूर्वी डॉ. तानाजी कोळेकर, विद्यापरिषद सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या ५ सदस्यीय समितीने भेटी द्याव्यात. सदर समितीचा प्रवास व दैनिक भत्ता याचा खर्च संबंधीत महाविद्याल यांनी अदा करावा.
२ ४०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्येची मागणी केलेल्या महाविद्यालयांनी सर्व सोयी सुविधांची पूर्तता केली आहे का नाही याबाबत सदर समितीने खात्री करावी.
३ ४०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्या मागितलेल्या महाविद्यालयांकडून प्रती विद्यार्थी रु.१०००/- याप्रमाणे दंड आकरण्यात यावा.
४ खालील तक्त्यातील महाविद्यालयांना ४०% पर्यंतच वाढीव विद्यार्थी संख्या देण्यात यावी.
५ महाविद्यालयांकडून अटींची पूर्तता होत नाही तोपर्यंत सदर समिती महाविद्यालयांस भेट देत राहील.
६ वाढीव विद्यार्थी संख्येसंदर्भात या महाविद्यालयां व्यतिरिक्त इतर महाविद्यालयांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यांना या ठरावानुसार कार्यवाही करुन मान्यता देण्यात यावी.
७ येथून पुढे प्रथम वर्षापासून १०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्या कोणत्याही महाविद्यालयास देण्यात येऊ नये. तथापि, खालील तक्त्यात नमूद ज्या महाविद्यालयांना ४०% पर्यंत जास्त वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करण्यात आली आहे. त्या महाविद्यालयांना सदर अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत सदर वाढ मान्य राहील.

तद्नंतर दि.०३/०९/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेमध्ये ठराव क्र.०१ अन्वये दुरुस्त केलेल्या ठरावा नुसार उपरोक्त ठरावामधील मुद्दा क्र. १, २ व ३ च्या अनुरोधाने डॉ. तानाजी कोळेकर, विद्यापरिषद सदस्य समितीने खालील तक्त्यात नमूद केलेल्या महाविद्यालयास भेट देऊन अहवाल सादर केलेला आहे.

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | अभ्यासक्रम | जादा वाढीव विद्यार्थी संख्या मागणी |
|---|---|---|---|
| १ | श्रीराम इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी पानीव | बी.एस्सी. (ई.सी.एस.) भाग - २ | विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/ २०२४-२५/ ७०६१, दि. २१/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये ४०% वाढीव विद्यार्थी संख्येस मान्यता देण्यात आलेली आहे. तद्नंतर महाविद्यालयाने पुनश्च: २०% महाविद्यालयाने २०% जादा वाढीव विद्यार्थी संख्येची मागणी केलेली आहे. असे एकुण ४०% + २०% = ६०% वाढीव विद्यार्थी संख्या होत असल्याने उपरोक्त समितीने भेट देऊन अहवाल सादर केला आहे. |

डॉ. तानाजी कोळेकर, विद्यापरिषद सदस्य, या गठित समितीचा अहवाल दि.२५/११/२०२४ रोजीच्या बैठकीत सादर केला असता विद्यापरिषदेचा खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

"प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करणेबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून पदवी भाग २ व ३ या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयाने मागणी केल्याप्रमाणे वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करण्याबाबत दि.२८/०८/२०२४ व दि.०३/०९/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत झालेल्या ठरावानुसार डॉ. तानाजी कोळेकर, विद्यापरिषद सदस्य या गठित समितीचा अहवाल सर्वानुमते स्विकारण्यात आला व वरील महाविद्यालयास ६०% जादा वाढीव विद्यार्थी संख्येस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

मात्र, ४०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी घेतलेल्या महाविद्यालयांकडून प्रती विद्यार्थी रु.१०००/- याप्रमाणे दंड आकारणेबाबत निर्णय घेण्यासाठी सदर दंडाबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."

सबब, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करणेबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून पदवी भाग २ व ३ या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयाने मागणी केल्याप्रमाणे वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करण्याबाबत दि.२८/०८/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठरावाची दि.०३/०९/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत झालेल्या दुरुस्ती ठरावाच्या अनुरोधाने डॉ. तानाजी कोळेकर, विद्यापरिषद सदस्य, या गठित समितीचा अहवाल दि.२५/११/२०२४ रोजीच्या बैठकीत सादर केला असता ४०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी घेतलेल्या महाविद्यालयांकडून प्रती विद्यार्थी रु.१,०००/- याप्रमाणे दंड आकारणेबाबत निर्णय घेण्यासाठी विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.

ठराव:

**१. डॉ. तानाजी कोळेकर, विद्यापरिषद सदस्य या गठित समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने दि.२५/११/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. ५१ अन्वये, ४०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी घेतलेल्या महाविद्यालयांकडून प्रती विद्यार्थी रु. १,०००/- याप्रमाणे दंड आकारण्यात येऊ नये असे सर्वानुमते ठरले.**

**२. शै. वर्ष २०२५-२६ पासून प्रवेश क्षमतेपेक्षा १०% पेक्षा जादा वाढीव विद्यार्थी संख्या कोणत्याही महाविद्यालयास देण्यास येऊ नये. याबाबत संलग्नित महाविद्यालयास परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.**

**३. मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थी प्रवेशित केल्यास संबंधित महाविद्यालयाकडून रु.५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) इतका दंड आकारण्यात यावा असे ठरले.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | दि.०२/१२/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.<br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.०२/१२/२०२४ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>विद्यापीठ परिनियम S.३३९ (f) नुसार दि.०२/१२/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.<br>सबब, दि.०२/१२/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | दि.०२/१२/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०४ ] | दि.०६/१२/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.<br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.०६/१२/२०२४ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>विद्यापीठ परिनियम S.३३९ (f) नुसार दि.०६/१२/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.<br>सबब, दि.०६/१२/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | दि.०६/१२/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th colspan="2">विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ०५ ]</td><td colspan="2">दि.०६/१२/२०२४ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.०६/१२/२०२४ रोजीच्या खरेदी समितीच्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.<br>टिपणी: दि.०६/१२/२०२४ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No. S.३२४ नुसार वित्त व लेखा समितीची व व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. दि.०६/१२/२०२४ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेल्या दि.०६/१२/२०२४ रोजीच्या खरेदी समितीच्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.</td><td>वित्त व लेखा विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td colspan="2">दि.०६/१२/२०२४ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेल्या खरेदी समितीच्या दि.०६/१२/२०२४ रोजीच्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतील विषय क्र.२ वर झालेल्या ठरावामध्ये खालीलप्रमाणे सुधारित मंजुरी देऊन कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td><td></td></tr>
<tr><td></td><td>ठराव क्र. २</td><td>१. विद्यापीठास आवश्यक असलेले Scanning, ICR, OCR, Digitization of Students Mark Sheet and web portal Devlopment या करीता न्युनतम दर असलेल्या M/s. Edulab Educational Exchange Pvt. Ltd, Mumbai या फर्मला रु.१,१९,३६,०००/- (अधिक १८% GST) या रकमेइतके काम देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>२. वरील कामासाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेतील ledgers व Old mark sheet हे समान दर असलेल्या कामांबाबत नमूद असलेल्या प्रत्येकी नगाचा विचार न करता दोन्ही मिळून एकूण २५ लाख कागदपत्रांचे Scanning प्रथम करावे असे सर्वानुमते ठरले.<br>३. निविदेमध्ये प्रसिध्द केलेल्या ledgers व Old mark sheet चे Scanning पूर्ण झाल्यानंतर Office Record मधील कागदपत्रांचे Scanning करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.<br>४. Degree Certificate व Design Develop and Deployment of Web Portal ONE TIME COST चे काम दिलेल्या दरामध्ये करुन घ्यावे असे सर्वानुमते ठरले.<br>५. निविदेमध्ये प्रसिध्द केलेल्या Office Record वगळता उर्वरीत सर्व जी निविदा प्रस्तावामध्ये नमूद केली आहे ती कामे ही एक वर्षाच्या आत कंपनीने पूर्ण करावी असे करारपत्रात नमूद करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०६ ] | **प्रस्तुत विद्यापीठातील इंटरनेट सुरक्षेसाठी फायरवॉल (Hardware and Software) खरेदी करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठामध्ये सद्यस्थितीत इंटरनेटच्या सुरक्षेसाठी Gajshield Infotech Pvt. Ltd. Company चे GS५६०dc हे Firewall कार्यरत आहे. सदर Firewall २०१६ साली NMEICT या प्रकल्पातंर्गत BSNL मार्फत खरेदी केलेले आहे. तसेच या Firewall ला लागणारे License चे Subscription दि.०१ डिसेंबर, २०२१ रोजी ३ वर्षाकरिता नुतनीकरण करण्यात आले होते. सदर License च्या Subscription ची मुदत ०१ डिसेंबर, २०२४ रोजी मुदत संपलेली आहे. Firewall च्या Upgraded Software चे नुतनीकरण करावयाचे आहे. तथापि, Upgraded Software सद्यस्थितीत असलेल्या Firewall ला तांत्रिकदृष्ट्या चालत नाही, असे कंपनीने दि.०५ नोव्हेंबर, २०२४ रोजी E-mail द्वारे कळविले आहे. सदर कंपनीला पुढील ६ महिने करिता Subscription Fee चालू ठेवणेबाबत दि.२५/११/२०२४ रोजीच्या E-mail द्वारे Subcription Fee ची रक्कम रु.२,३७,७००.६५<br>(सर्व करासहीत) इतकी कळविलेली आहे. सदर रक्कम जास्त असल्यामुळे सद्यस्थितीत दोन महिन्याकरीता Firewall संदर्भात पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.<br>विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या इंटरनेटचे नियंत्रण करण्यासाठी तसेच विद्यापीठातील माहितीच्या सुरक्षिततेसाठी Firewall (Hardware व Software) असणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी सद्याचे Firewall (Hardware व Software) Upgrade करणे आवश्यक आहे. याकरिता Firewall नवीन बसविणे गरजेचे आहे. सदर Firewall (Hardware व Software) ३ वर्षाकरिता नवीन खरेदी करण्यासाठी लागणारी किंमत अंदाजे रु.३०,००,०००/- + GST इतका खर्च अपेक्षित आहे.<br>१) सदर Firewall व License ई-निविदा प्रक्रियेद्वारे खरेदी करण्यास मान्यता असावी.<br>२) यासाठी होणारा अंदाजे खर्च रु.३०,००,०००/- + GST सन २०२४-२५ च्या Purchase of Computers and Peripherals for University या अंदाजपत्रकीय शिर्षकामधील उपलब्ध तरतुद रु.१ कोटीमधून करण्यास मान्यता असावी.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठातील इंटरनेट सुरक्षेसाठी Firewall (Hardware व Software) खरेदी करण्याची बाब विचारार्थ. | आयटी सेल |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाच्या सध्याच्या ३७ एकर पसिरसरातील इंटरनेट सुरक्षेसाठी फायरवॉल (Hardware and Software) खरेदी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. सदर कंपनीला ६ महिन्याकरीता Subscription Fee देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली आणि पुढील Subscription साठी निविदा प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी.<br>तसेच दरम्यानच्या काळात सध्या अस्तित्वात असलेली इंटरनेट लाईन नवीन कॅम्पसवर नेता येईल का याची पडताळणी NIC यांच्याकडून करुन घ्यावी.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ७(१) ] | दि.१७ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये SHPC या गोपनीय फर्मच्या देयकासंदर्भात सत्यता पडताळणी करण्यासाठी गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीचा फेर अहवालानुसार SHPC Technology Pvt. Ltd या फर्मला आदा केलेली अधिकची रक्कम रु.२,१३,२००/- ही मार्च-२०२४ च्या परीक्षा देयकामधून वसुली संदर्भात कायदेशीर नोटिस देण्यात यावी असा ठराव करण्यात आला होता सदरचा ठराव फेरविचारार्थ.<br>टिपणी: व्यवस्थापन परिषदेच्या दि.१७ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.१३ वरील ठरावानुसार कार्यवाही करण्यात येवून मा. कुलगुरुमहोदय यांच्या मान्यतेनुसार सदर SHPC Pvt. Ltd या गोपनीय फर्मला कायदेशीर नोटिस पाठविण्यासाठी सदरचे प्रकरण कायदा विभागाकडे वर्ग करण्यात आले होते. सदर प्रकरणी सदर फर्मची देयकासंदर्भात सर्व कागदपत्रांची तपासणी केली असता, मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ व कायदा अधिकारी यांच्या झालेल्या तोंडी चर्चेनुसार सदर गोपनीय फर्मला दि.२८/०२/२०२० रोजी देण्यात आलेले कार्यारंभ आदेश व त्यानुसार त्याचे तयार झालेले बिल व सदर फर्मला दि.०२/०१/२०२३ रोजी देण्यात आलेले कार्यारंभ आदेश ह्या वेगळ्या असून दोन्ही कार्यारंभ आदेशाचा अभ्यास करुन भविष्यात कोणतीही कायदेशीर पेच निर्माण होवू नये म्हणून सदर प्रकरणी दि.१७ सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेमध्ये झालेल्या ठराव फेरविचारार्थ ठेवण्यात यावा असे वाटते.<br>सबब, दि.१७ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये SHPC या गोपनीय फर्मच्या देयकासंदर्भात सत्यता पडताळणी करण्यासाठी गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीचा फेर अहवालानुसार SHPC Technology Pvt. Ltd या फर्मला आदा केलेली अधिकची रक्कम रु.२,१३,२००/- ही मार्च-२०२४ च्या परीक्षा देयकामधून वसुली संदर्भात कायदेशीर नोटिस देण्यात यावी असा ठराव करण्यात आला होता सदरचा ठराव फेरविचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | **सदरबाबत विद्यापीठ कायदा अधिकारी यांचा लेखी स्वयंस्पष्ट अभिप्राय घेण्यात यावा व कायदा अधिकारी यांच्या अभिप्रायासह सत्यता पडताळणी करण्यासाठी गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीने फेरविचार करुन सदरचा विषय पुनश्च व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ७(२) ]</td><td>प्रस्तुत विद्यापीठ कौशल्य विकास केंद्र व सेडीबझ ग्लोबल टेक्नॉलॉजी, पुणे या संस्थेसोबत विविध कौशल्याधारित अभ्यासक्रमास सुरु करण्यासाठी सामंजस्य करार करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: कौशल्य विकास केंद्राची स्थापन शैक्षणिक वर्ष २००५ पासून केलेली असून कौशल्य विकास केंद्रामार्फत सद्यस्थितीत वेगवेगळ्या विद्याशाखेचे कौशल्याधारित १४३ अभ्यासक्रम चालविले जातात. प्रस्तुत विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्राच्या कार्याची दखल राज्य शासनाच्या स्तरावर घेण्यात आलेली आहे.<br>सेडीबझ ग्लोबल टेक्नॉलॉजी, पुणे यांनी दि.१२/०७/२०२४ रोजीच्या ईमेलद्वारे कौशल्य विकास केंद्र अंतर्गत विविध अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी सामंजस्य कराराचा मसूदा सादर केला होता. सदरील मसूदा प्रस्तुत विद्यापीठातील MoU Cell कडे तपासणीकरीता सादर करण्यात आला होता. सदरील संस्थेने दि.२८/११/२०२४ रोजी MoU Cell ने सुचविलेल्या दुरुस्तीनुसार पुन:श्च मसूदा सादर केला होता. दि.०७/१२/२०२४ रोजी झालेल्या MoU Cell च्या बैठकीतील ठरावानुसार दुरुस्तीसह सामंजस्य कराराची शिफारस करण्यात आलेली आहे.
<table>
<tr><th>Courses</th><th>Self-Paced Learning</th></tr>
<tr><td>Personal Finance</td><td>₹1100/-</td></tr>
<tr><td>GST Executive</td><td>₹2000/-</td></tr>
<tr><td>Statutory Executive</td><td>₹2500/-</td></tr>
<tr><td>Finance Executive</td><td>₹2800/-</td></tr>
<tr><td>GST Assistant OJT</td><td>₹3000/-</td></tr>
<tr><td>Accounts Assistant OJT</td><td>₹3000/-</td></tr>
<tr><td>UG Integrated</td><td>₹2800/-</td></tr>
<tr><td>PG Integrated</td><td>₹2800/-</td></tr>
</table>
सबब, प्रस्तुत विद्यापीठ कौशल्य विकास केंद्र व सेडीबझ ग्लोबल टेक्नॉलॉजी, पुणे या संस्थेसोबत विविध कौशल्याधारित अभ्यासक्रमास सुरु करण्यासाठी सामंजस्य करार करण्याची बाब विचारार्थ.</td><td>कौशल्य विकास केंद्र</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>प्रस्तुत विद्यापीठ कौशल्य विकास केंद्र व सेडीबझ ग्लोबल टेक्नॉलॉजी, पुणे या संस्थेसोबत विविध कौशल्याधारित अभ्यासक्रमास सुरु करण्यासाठी सामंजस्य करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td><td></td></tr>
</table>

प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्र-कुलगुरु यांनी अध्यक्षांच्या परवानगीने खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय सादर केला.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ७(३) ] | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व HCL Technologies Limited, New Delhi यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य कराराचा मसुदा संस्थाशी करावयाच्या करार वापरण्याची बाब मसूदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर HCL Technologies Limited, New Delhi यांच्यामध्ये सामंजस्य करार करणेबाबत विद्यापीठाच्या MoU सेल कडून तपासून घेण्यात आली आहे. अंतर्गत विद्यार्थी यांचे On Job Traning (OJT), आदान- प्रदान व कॉन्फरन्स, सेमिनार यांचे संयुक्त आयोजन, पब्लिकेशन, Online Support for Software demo, training to faculty, course materials, Career Guidance इत्यादी गोष्टींचा समावेश आहे.<br>HCL Technologies Limited, New Delhi यांच्यासोबतही अशा स्वरूपाचा सामंजस्य करार केल्यास विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीकरीता On Job Traning (OJT), Online Support for Software demo, training to faculty, course materials, Career Guidance यासंबंधित फायदेशीर होईल. यास्तव, HCL Technologies Limied, New Delhi यांच्यासोबत जोडलेल्या मसुद्यानुसार विद्यापीठाचा सामंजस्य करार करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | संगणकशास्त्र संकुल |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल व HCL Technologies Limited, New Delhi यांचेसोबत सामंजस्य करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद